NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 34) 1st September 2009 ( No : 10

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे आंदोलन*

# आंदोलनाच्या ठरावापासून तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या काळातील घटनाक्रमाचा अहवाल

प्रा. डॉ. एकनाथ कठाळे, *महासचिव* व प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी, *सहसचिव*

१. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत आपल्या मागण्यांच्या संदर्भात **आंदोलनाचा ठराव** सम्मत केला होता. (*Circulated on pages 89 to 100 of 2009 NUTA Bulletin.)*

२. दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी सम्मत झालेल्या महासंघाच्या ठरावाची प्रत दिनांक २० एप्रिल २००९ रोजी राज्याचे **मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षणमंत्री यांना** महासंघाचे अध्यक्ष व महासचिव यांनी पत्राद्वारे सादर केली. (*Circulated on page 90 of 2009 NUTA Bulletin.)* तसेच २९ एप्रिल २००९ ते ५ मे २००९ या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेल्या सर्व विद्यापीठस्तरीय संघटनांनी आपआपल्या **मुखपत्राचा आंदोलन विशेषांक** प्रकाशित करुन तो विशेषांक महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वितरित करण्यात आला होता व त्या अंकाच्या प्रती मा. मुख्यमंत्री, मा. उच्चशिक्षण मंत्री, मा. उच्च शिक्षण सचिव व मा. उच्च शिक्षण संचालक यांना देखील पाठविण्यात आल्या होत्या.

३. त्यानंतर दिनांक २९ एप्रिल २००९ ते २६ मे २००९ या कालखंडात महाराष्ट्रभर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या **जिल्हा मेळाव्यांचे आयोजन** करण्यात आले होते. याच कालखंडात **विद्यापीठस्तरीय मेळाव्यांचे आयोजन** करण्यात आले होते.

४. सोमवार, दिनांक १५ जून २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता महाराष्ट्रातील त्या त्या विभागातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी **विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयासमोर निदर्शने** करुन त्यांच्या मार्फत मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना आंदोलनाच्या सूचनेची प्रत सादर केली होती. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक हजारोंच्या संख्येत सहभागी झाले होते.

५. सोमवार, दिनांक २२ जून २००९ रोजी महाराष्ट्रातील **सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर** त्या त्या जिल्ह्याच्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी निदर्शने करुन जिल्हाधिकाऱ्यामार्फत मा. मुख्यमंत्र्यांना आंदोलनाच्या सूचनेची प्रत पाठविली. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील हजारो विद्यापीठस्तरीय व महाविद्यालयीन शिक्षक सहभागी झाले होते.

६. त्यानंतर सोमवार दिनांक ६ जुलै २००९ रोजी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक एक दिवसाच्या '**सामुहिक रजा आंदोलनात**' सहभागी झाले होते.

७. १९ एप्रिल २००९ ते १४ जुलै २००९ या कालखंडात मा. उच्च शिक्षण सचिवांनी किंवा मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी **एकदाही संघटनेबरोबर संपर्क साधला नाही, चर्चा केली नाही** किंवा आंदोलनकर्त्यांचे काय म्हणणे आहे ते समजावून घेतले नाही. अशा रितीने महाराष्ट्र शासनाने महासंघाच्या आंदोलनाची दखल न घेतल्याने ठरलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक १४ जुलै २००९ पासून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी '**बेमुदत काम बंद आंदोलन' सुरु केले.**

८. दिनांक १४ जूलै २००९ पासून महासंघातर्फे सुरु करण्यात आलेल्या बेमुदत काम बंद आंदोलनाचा परिणाम म्हणून दिनांक १५ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मा. उच्च शिक्षण मंत्री व सचिव यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी निमंत्रण दिले व महासंघासोबत दिनांक १५, १६ व १८ जुलै २००९ रोजी महासंघाच्या मागण्या संदर्भात चर्चा केली. मागण्यासंदर्भात चर्चा करुन उभयपक्षी मतैक्यपत्र तयार करण्यापेक्षा **आमचे म्हणणे आम्ही तुम्हाला कळवू** असे म्हणून चर्चा संपली. त्या अनुषंगाने शासनाने दिनांक २४ जुलै २००९ रोजी आंदोलनाच्या मागण्यासंदर्भात पत्र (पहिले पत्र) महासंघाला दिले. (**सहपत्र : एक** म्हणून सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४२ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

९. सदर पत्राच्या वाचनानंतर महासंघासोबत सचिव फार मोठा घातपात करित आहेत असे लक्षात आले. कारण या पत्रात सचिवांनी असे स्पष्टपणे नमूद केले होते की "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" या वाक्याचा अर्थ पत्र लिहिणाऱ्यांना कळला की नाही हे त्यांचे त्यांना ठाऊक पण महासंघाला तो नक्की कळला. राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या वेतनश्रेण्या व ३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यांमध्ये जुन्या समतुल्य वेतनश्रेण्यांसाठी सारखेच पे बँड प्रस्तावित असले तरी ग्रेड पे मध्ये फार मोठे फरक असून त्यात यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या सरस आहेत. शिवाय श्रेणीवाढीची बहूमुखी संधी हे यु.जी.सी. वेतनश्रेण्यांचे एक खुपच आकर्षक वैशिष्ट्य आहे. हे लक्षात घेता उपरोक्त वाक्याच्या वाचनाने महासंघाच्या कार्यकारी मंडळाला आश्चर्य वाटले. **महाराष्ट्रभर प्राध्यापकांमध्ये या वाक्यामुळे संतापाची लाट उसळली.** दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत शासनाच्या या पहिल्या पत्राच्या निषेधाचा एक तपशिलवार ठराव सम्मत करुन तो मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना पाठविण्यात आला. (*Circulated on pages 113 to 120 of 2009 NUTA Bulletin.)*

१०. याच दरम्यान आंदोलनाच्या पुढील कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यभर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी निर्धारपूर्वक सुरु ठेवली. दिनांक २० जुलै २००९ पासून महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी जिल्ह्याच्या ठिकाणी **राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या सार्वजनिक समारंभात/कार्यक्रमाच्या स्थळी** नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा धिक्कार म्हणून व अशा मनोवृत्तीला आवर घालण्यास शासनाला आलेल्या अपयशाच्या विरोधात **तीव्र निदर्शने** केलीत. याच दरम्यान दिनांक २२ जुलै २००९ रोजी **नाशिक येथे झालेल्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या वेळी** राज्यातील हजारो प्राध्यापकांनी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत तीव्र निदर्शने करुन शासनाच्या नाकर्तेपणाचा निषेध केला.

११. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन मा. उच्च शिक्षण मंत्री व सचिवांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी आमंत्रित केले. दिनांक २८, २९ व ३० जुलै २००९ रोजी ही चर्चा झाली, मात्र चर्चा करुन

एकमताचा मार्ग काढण्याऐवजी शासनाने दिनांक ३१ जुलै २००९ रोजी महासंघाच्या **अध्यक्षांना एकतर्फी पत्र (दुसरे पत्र)** दिले. (**सहपत्र : दोन** सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४३ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

१२. शासनाच्या दुसऱ्या पत्राच्या निषेधार्थ व त्यांच्या एकूण भूमिकेच्या निषेधार्थ दिनांक ३१ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने एक ठराव सम्मत करुन **आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार** व्यक्त केला. तो ठराव सोबत सहपत्र ३ म्हणून दिलेला आहे. (**सहपत्र : तीन** सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४४ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

१३. सदर आंदोलनाच्या इशाऱ्याची नोंद घेऊन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी पदाधिकाऱ्यांना दिनांक ३ ऑगस्ट २००९ रोजी पुन्हा चर्चेसाठी बोलाविले. या चर्चेला प्रथमतःच राज्याचे वित्त मंत्री हजर होते. त्यांच्या सोबत झालेल्या चर्चेनंतर **एकतर्फी पत्र पाठविण्याचा प्रकार त्यांनी सुरुच ठेवला.** दिनांक ४ ऑगस्ट २००९ रोजी पुन्हा एक पत्र **(तिसरे पत्र)** उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे पाठविण्यात आले. (**सहपत्र : चार** सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४५ वर प्रसृत करण्यात आले आहे.) मा. कुलगुरूंना या सर्व प्रकारामध्ये गोवण्याचा निषेध म्हणून दिनाक ४ ऑगस्ट २००९ रोजी विद्यापीठ कार्यालयावर मोर्चा काढून मा. कुलगुरूंना निवेदन देण्यात आले.

१४. ४ ऑगस्ट २००९ चे शासनाचे पत्र दिनांक २४, ३१ जुलै २००९ रोजीच्या पहिल्या व दुसऱ्या पत्रापेक्षाही जास्त घातक मजकूराने भरलेले असल्याने महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ६ ऑगस्ट २००९ रोजी तातडीच्या बैठकीत ठराव सम्मत करुन दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी महाराष्ट्रभर **'जेलभरो आंदोलना'च्या माध्यमातून आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला** व यापुढे उच्च शिक्षण मंत्र्यांनीच 'चर्चा नाही' अशी भूमिका घेतल्यामुळे **त्यांच्याशी यापुढे चर्चा न करण्याचा निर्णय घेण्यात आला** व राज्याचे मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी याबाबतीत तत्परतेने लक्ष घालावे अशी त्यांना विनंती करण्याचा निर्णय घेण्यात आला. (**सहपत्र : पाच** म्हणून सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४६ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

१५. राज्यभर दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी 'जेल भरो आंदोलना'च्या ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांवर मोर्चाचे आयोजन करुन त्या त्या ठिकाणी **हजारो शिक्षकांनी स्वतःला अटक करवून घेतली.**

१६. महासंघाच्या ठरावानुसार दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी आयोजित 'जेल भरो आंदोलनात' अमरावती येथे प्रा. बी.टी.देशमुख यांनी सहभागी होतांना जिल्हाधिकारी अमरावती यांचेमार्फत आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा सपत्र मा. सभापती यांचेकडे पाठविला. (**सहपत्र : सहा** म्हणून सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४७ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

१७. राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला दिनांक १६ ऑगस्ट २००९ रोजी दुपारी १२.३० वाजता आपल्या **वर्षा निवासस्थानी चर्चेसाठी बोलाविले.** अभ्यागत दालनामध्ये कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य बसले असतांना सुरुवातीला प्रा.बी.टी.देशमुख यांना बोलाविले असल्याचा निरोप आला. मा. मुख्यमंत्र्यांनी १०-१५ मिनिटे प्रा. बी.टी.देशमुख यांच्याशी बंदद्वार चर्चा केली. मागण्या समजावून घेतल्या. त्यानंतर संपूर्ण कार्यकारी मंडळाशी चर्चा केली. मागण्या समजावून घेतल्या. मा. मुख्यमंत्र्यांशी दिनांक १६ ऑगस्ट २००९ रोजी ही जी चर्चा झाली त्याची माहिती देणारे एक **"वृत्तपत्रिय प्रसारण"** महासंघाने त्याच दिवशी प्रसारित केले होते. (**सहपत्र : सात** म्हणून सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४८ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

१८. मा. मुख्यमंत्र्यांनी पुढील चर्चेसाठी दिनांक २० ऑगस्ट २००९ रोजी दुपारी २.०० वाजता पुन्हा आमंत्रित केले. ही बैठक मा. मुख्यमंत्र्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात झाली. या बैठकीला मा. मुख्यमंत्र्यासमवेत, मा. वित्त मंत्री, मा. उच्च शिक्षण मंत्री, उच्च शिक्षण सचिव, विधी व न्याय सचिव व वित्त सचिव हे उपस्थित होते. यावेळी झालेल्या चर्चेत अनेक पर्याय समोर आले. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी ही चर्चा पुढे सुरु ठेवावी असे मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

१९. दरम्यानच्या काळात आंदोलन मोडून काढण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सचिवांनी १२ ऑगस्ट २००९ चा शासन निर्णय निर्गमित केला. त्यावर तारीख जरी १२ ऑगस्ट टाकण्यात आली असली तरी तो प्रत्यक्षात १७ तारखेला संकेत स्थळावर उपलब्ध झाला. त्या शासननिर्णयावर महासंघाची तात्काळ प्रतिक्रीया देणारे एक वृत्तपत्रिय

*सहपत्र : एक*

# *महाराष्ट्र शासन*

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, : मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

### *क्र. एनजीसी २००८/२४३/२००८/विशि-१ : दिनांक : २४ जुलै, २००९*

प्रति,
**अध्यक्ष,**
महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज ॲण्ड कॉलेज टिचर्स ऑरर्गनायझेशन,
आर.के. गोकुळधाम, ए/२०५ एस.व्ही.रोड, बोरीवली (प) मुंबई- ४०० ०१२

**विषय** :- आपण पुकारलेला संप मागे घेण्याबाबत.

प्रिय महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने दिनांक १५ व १६ जुलै २००९ रोजी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या समवेत झालेल्या आपल्या चर्चेनुसार मला आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे आदेश आहेत :-

(१) केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्रमांक 1-32/2006-U-II/U.1(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ. बाबतच्या शिफारशी केल्या आहेत, त्याचा राज्य मंत्रिमंडळाने २३ जुलै, २००९ रोजी विचार करुन **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**

(२) महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये यांनी सन १९९१ ते ९९ या कालावधीत बरेचसे बिगर नेट सेट उमेदवार अधिव्याख्याता म्हणून नेमलेले आहेत. अशा अधिव्याख्यात्यांना नेट सेट अर्हतेपासून सूट देण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार आणि मा. न्यायालयांच्या निर्णयानुसार संबंधित विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविलेले/पाठवावयाचे आहेत. ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करणार आहे. :-

**(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील.**

(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्तरावर पूर्ण केले असल्याचे कळते.

(३) आपल्या मुख्य मागण्यांकडे शासनाने योग्य ते लक्ष घातलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आपण आपला संप मागे घेण्याची आपणास विनंती आहे.

आपला
**(रा.गो.जाधव)**
शासनाचे उप सचिव

प्रसारण महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी १८ ऑगस्ट २००९ रोजी प्रकाशित केले. (**सहपत्र : आठ** सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १४९ वर प्रसृत करण्यात आले आहे.) निर्गमित करण्यात आलेला १२ ऑगस्ट २००९ चा शासन निर्णय हा शासन निर्णय अंतिम नाही असे परिच्छेद १४ वाचल्यानंतर दिसून येत होते. खरे म्हणजे मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय लोकांना ज्ञात होण्यासाठी शासननिर्णय काढला जातो. "हा शासन निर्णय भारत सरकारच्या दिनांक ३१.१२.२००८ च्या समग्र योजनेबाबत राज्य सरकारने जो निर्णय घेतलेला आहे त्याच्या अधिन असेल" असे परिच्छेद १४ मध्ये म्हटलेले होते. याचा सरळ अर्थ असा की या शासननिर्णयात नंतर अनेक बदल होऊ शकतात. उदा. आयटीआय निदेशकांच्या वेतनश्रेण्या बाबतीत सभागृहात आश्वासने देण्यात आली. त्याप्रमाणे १७ जानेवारी २००४ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासननिर्णय काढला. सभागृहात सांगितल्याप्रमाणेच हा शासननिर्णय होता. "हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १२/२००४/सेवा-९/५/१/२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत." असा स्पष्ट उल्लेख त्या शासननिर्णयात होता. त्यानंतर शासनाच्या वित्त विभागाने एक साधे पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभागाला पाठविले. त्यात "७५००" ऐवजी "७४५०" करावे व "१२०००" ऐवजी "११५००" करावे, असे नमूद होते. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ११ डिसेंबर २००६ रोजी शासननिर्णय काढून तशा दुरूस्त्या केल्या. याबाबत २४ जुलै २००७ रोजी सभागृहात चर्चा झाली, तेंव्हा उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी सभागृहात असे सांगितले की, "कॅबिनेटसमोर नोट ठेवतांना प्रिंटींग मिस्टेक झालेली आहे. कॅबिनेटसमोर जाऊन आम्ही ते पुन्हा दुरूस्त करू." अजूनही ही दुरूस्ती झालेली नाही. सारांश काय तर "टायपिंग मिस्टेक" झाली असेल तरी उच्च व तंत्रशिक्षण विभागाला मूळ जी.आर.मध्ये दुरूस्तीचा जी.आर. काढावा लागतो. मंत्रिमंडळाने ज्या गोष्टी मान्यच केलेल्या नाहीत त्या जर शासननिर्णयात टाकल्या असतील व त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी घेऊन ठेवली असेल तर अशा दुरूस्त्या करणारे अनेक जी.आर. मागाहून काढण्याचा घाऊक परवानाच घेऊन ठेवल्यासारखे होते.

२०. उच्च शिक्षण मंत्र्यांसोबत दिनांक २१ व २५ ऑगस्ट २००९ रोजी चर्चेच्या विविध बैठका झाल्यात पण मतैक्य पत्र तयार होऊ शकले नाही. दिनांक २६ ऑगस्ट २००९ हा दिवस चर्चेच्या दृष्टीने निर्णायक ठरला. सकाळी ११ वाजता मंत्रालयातील मा. उच्च शिक्षण मंत्री यांच्या दालनात चर्चा सुरु झाली. स्वतः उच्च शिक्षण मंत्री चर्चा करित होते. उच्च शिक्षण सचिव या बैठकीला दिवसभर हजर राहीले नाहीत.

२१. बाहेर असे समजले की सचिव त्याचवेळी वृत्तपत्रांच्या काही प्रतिनिधींना बोलावून आंदोलन मोडून काढण्यासाठी हजारो रुपयांच्या जाहिरातींचे वाटप करित होते. "**१९९१ नंतर लागलेल्या व नेट-सेट नसलेल्या सर्व शिक्षकांच्या नेमणूका बेकायदेशीर आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगातील कोणत्याही वेतनश्रेणीत टाकता येणार नाही**" अशी भूमिका सचिवांनी घेतली होती. "**यांना काढून टाकता येईल काय?**" याबाबत त्यांनी विधी विभागाकडे लेखी मत मागविले होते. काढून टाकण्याच्या बाबतीत विधी विभागाने "Not desirable" या शब्दात त्यांना लेखी मत दिल्यामुळे पाचव्या वेतन आयोगाच्या आहे त्याच वेतनश्रेणीत या शिक्षकांना ठेवण्याचा निर्धार सचिवांनी केला होता. तशा तरतुदी त्यांनी १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयात टाकूनच ठेवल्या होत्या व तशा जाहिराती ते वृत्तपत्रांना देत होते.

२२. अशा वातावरणात २६ तारखेला ११ वाजेपासून तर ३ वाजेपर्यंत मा. श्री. राजेश टोपे यांच्याशी चर्चा चालू होती. हा प्रश्न चर्चेने मिटला पाहिजे, सामोपचाराने मिटला पाहिजे, अशी श्री. राजेश टोपे यांची तळमळीची इच्छा होती. पण त्याला सचिवांची अजिबात साथ नव्हती. ते या बैठकीला ५ मिनिटेसुद्धा हजर राहिले नाहीत. एका उपसचिवाला त्यांनी तेथे बसवून ठेवले होते. मा. श्री. राजेश टोपे यांच्याशी चर्चा करुन

***सहपत्र : दोन***

# *महाराष्ट्र शासन*

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, : मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

### *क्र. एनजीसी (२००८/२४३/०८)/विशि-१ : दिनांक : ३१ जुलै, २००९*

प्रति,
**अध्यक्ष,**
महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज अ‍ॅण्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन, आर.के. गोकुळधाम, अे/२०५, एस.व्ही.रोड, बोरीवली (प) मुंबई- ४०० ०९२

**विषय** :- आपण पुकारलेला संप मागे घेण्याबाबत.

**संदर्भ** :- समक्रमांकाचे दि. २४ जुलै, २००९ चे पत्र

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मा. मंत्री (उ.व तं.शि.) यांच्या समवेत दि. १५ व १६ जुलै, २००९ रोजी झालेल्या चर्चेनुसार आपणांस संदर्भाधीन पत्रान्वये शासनाकडील वस्तुस्थिती कळविण्यात येऊन संप मागे घेण्याची विनंती करण्यात आली होती. या विषयी आपण व्यक्त केलेले संभ्रम स्पष्ट करण्यासाठी मा. मंत्री (उ.व तं.शि.) यांच्या समवेत पुन्हा दि. १८, २९ व ३० जुलै, २००९ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत.

२. केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्र.१-३२/२००६/U-II/U,१(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ.बाबतच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत.त्याचा विचार करुन राज्य शासनाने "राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना केंद्र शासनाप्रमाणे (यु.जी.सी. योजना) वेतनश्रेणी व महागाई भत्ता दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याचा व **इतर भत्ते व अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.**"

३. महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांनी सन १९९१ ते ९९ या कालावधीत बरेचसे बिगर नेट-सेट उमेदवार अधिव्याख्याता म्हणून नेमलेले आहेत. अशा अधिव्याख्यात्यांना नेट सेट अर्हतेपासून सूट देण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार आणि मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविलेले/पाठवावयाचे आहेत. ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करणार आहे. :-

(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबीत कामे त्वरीत पूर्ण करुन घेण्यात येईल.

(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(iii) **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करेल, त्या तारखेपासून सुट देण्यात येईल.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने सुट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्त्रावर पूर्ण केले असल्याचे कळते.

४. आपल्या मुख्य मागण्यांकडे शासनाने योग्य ते लक्ष घातलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आपण आपला संप मागे घेण्याची आपणास पुन्हा विनंती आहे.

आपला
**(रा.गो.जाधव)** शासनाचे उप सचिव

एक लहानसा मसुदा तयार झाला तर तो टाईप होवून २ तास परत येत नव्हता. आला तर ठरले त्यापेक्षा वेगळा येत होता व त्यावर पुन्हा चर्चा सुरु करावी लागत होती. एकदा मजकूर टाईप होवून परत येईपर्यंत उच्च शिक्षण मंत्री बाहेर गेले असतांना व दालनात फक्त प्रतिनिधी मंडळ बसले असतांना एक कनिष्ठ अधिकारी दालनात आला व म्हणायला लागला "तुमचे संघटनेचे लेटरहेड कुठे आहे? लेटर हेडवर तुमचे काय म्हणणे आहे ते लेखी लिहून द्या! म्हणजे आम्हाला ते प्रोसेस करता येईल." सर्वांनी त्याला सांगीतले की "आम्ही येथे लेटरहेड घेऊन आलेलो नाही. आम्हाला आता काही सूचना द्यायच्या नाहीत. चर्चेत जे काय ठरेल ते तुम्हाला लिहून घेता येत नसेल तर त्याला आमचा काही उपाय नाही." हे येथे थोडक्यात सांगितले, या शिवाय त्या अधिकाऱ्याची जी खरडपट्टी प्रतिनिधी मंडळाने काढली त्याचे सर्व तपशिल येथे नमूद करता येत नाहीत. तो बिचारा परत गेला.

२३. सचिव संपूर्णपणे असहकार करित आहेत ही गोष्ट उच्च शिक्षण मंत्र्यांच्या सुद्धा लक्षात आली होती. दरम्यान ४ वाजता मंत्रिमंडळाची बैठक होती. **"अर्ध्या तासात बैठक आटोपेल. त्यानंतर आपण पुन्हा बसू, आपण जावू नका, येथेच थाबा, आज आपल्याला हे मिटवावयाचे आहे."** असे सांगून उच्च शिक्षण मंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीला गेले. त्या दरम्यान ते मुख्यमंत्र्यांशी काही बोलले असावेत असा अंदाज करता येतो. मंत्रिमंडळ बैठकीत सुद्धा अनौपचारिकपणे या विषयावर काही चर्चा झाल्याचे नंतर कळले. प्रतिनिधी मंडळ त्या दालनातच थांबून राहिले. याच दरम्यानच्या काळात विधानपरिषद सदस्य श्री. वसंतराव खोटरे त्या दालनात आले व

### *सहपत्र : तीन*

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Affiliated to the All India Federation of University and College Teachers' Organisations (AIFUCTO)

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

## *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या शुक्रवार दिनांक ३१ जुलै २००९ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीत सम्मत झालेला ठराव.*

### मुंबई, दि. ३१ जुलै २००९

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना नवीन वेतन सुधारणा लागू करण्यासाठी ८० टक्के म्हणजे जवळजवळ २ ते ३ हजार कोटी रूपयांचे अर्थसहाय्य देण्यास केंद्र शासन तयार आहे, तसे त्यांनी राज्यशासनाला सहा महिन्यांपूर्वी लेखी कळविले आहे. **"या शिक्षकांना ४० टक्के थकबाकी ३१ मार्च २००९ च्या आत द्या ! आमच्याकडून या कामासाठी निधी घेऊन जा"** असे केंद्राने राज्याला कळवून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ झाला. केंद्रशासनाचे म्हणणे एवढेच आहे की, **"ही वेतन सुधार व्यवस्था 'समग्र योजना' म्हणून राज्य शासनाने लागू केली पाहिजे तरच अर्थसहाय्य मिळेल."** उच्च शिक्षण खात्याने याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. आता २४ जुलै २००९ रोजी संघटनेच्या अध्यक्षांच्या बोरीवली येथील निवासस्थानी एक पत्र पाठवून **"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय झाला आहे."** असे एका उपसचिवांनी कळविले. काल दिनांक ३० जुलै रोजी ही गोष्ट आम्ही माननीय उच्चशिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून दिली असता, "राज्यशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग" असे लिहण्यात आमची चूक झाली, हे त्यांनी मान्य केले. ती चूक आम्ही दुरुस्त करु. त्याऐवजी "केंद्र शासनाप्रमाणे (यु.जी.सी.) वेतनश्रेण्या लागू करण्यात येतील" अशी दुरूस्ती केलेले पत्र आम्ही उद्या पाठवू. **"केंद्रशासनाप्रमाणे वेतनश्रेण्या" व "केंद्रशासनाची वेतन सुधारणेची समग्र योजना"** यातील फरक त्यांना सांगण्याचा आम्ही प्रयत्न केला पण त्यांच्या ते लक्षात येत नव्हते. समग्र योजनेत काय बदल तुम्ही करणार आहात? ते तरी सांगा. आम्ही त्यावर विचार करू, अशी विनंती त्यांना केली, त्यावर सुद्धा ते तयार नव्हते. केंद्र शासनाचे दोन-तीन हजार कोटींचे अर्थसहाय्य गमवावे लागले तरी हरकत नाही, पण समग्र योजनेची मोडतोड करण्याचा त्यांचा निर्धार निषेधार्ह आहे.

नेटसेटच्या प्रश्नाबाबत तर त्यांनी कमालच केली आहे. डिसेंबर १९९९ पर्यंत महाराष्ट्रात नेटसेटची परीक्षा कायद्याने लागू करण्यात आली नव्हती, ही गोष्ट ते मान्य करतात. त्यांच्या पूर्वीच्या मा.उच्चशिक्षण मंत्र्यांनीसुद्धा ती गोष्ट मान्य केलेली आहे. पण त्याबाबत काहीही कारवाई करायला ते तयार नाहीत. २४ जुलै २००९ च्या पत्रात **"विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्तरावर पूर्ण केले असल्याचे कळते"** असे संघटनेला पत्राद्वारे त्यांनी कळविले. काल चर्चेच्यावेळी आम्हा सर्वासमक्ष विद्यापीठ अनुदान आयोगातील डेस्क ऑफिसरला फोन करून ते **"तुम्ही 'एक्झम्प्शन' देणारे जे पत्र पाठविले, त्यात त्या अधिव्याख्यात्यांची नेमणूकीची तारीख टाकली आहे पण त्याला सुट कोणत्या तारखेपासून द्यायची ते मात्र तुम्ही लिहून पाठविले नाही. ते जर लिहून पाठविले तर आमची सोय होईल"** असे ते सांगत होते. हे सारे आमच्यासमोरच चालू होते. डेस्क ऑफिसर काय म्हणाला हे कळायला मार्ग नाही. पण फोन ठेवल्यावर मा. मंत्री महोदय आम्हाला असे म्हणाले की, **"सुट ही कोणत्या तारखेपासून द्यायची याबाबत आम्ही विद्यापीठ अनुदान आयोगाकडे उद्याच पत्र पाठवू व त्यांचे उत्तर आल्यावर पुढील कारवाई करू."** तसे तुम्हाला उद्या पत्राने कळवू. आम्ही त्यांना सांगितले की, **"विद्यापीठ अनुदान आयोगातील बाबूशी फोनाफानी करण्याचा हा विषय नाही. तुमचे कायद्याचे पुस्तक हाती घ्या. नेटसेट परीक्षा कायद्याने पात्रतेची सक्तीची अट म्हणून केव्हा पासून लागू झाली हे तुम्हाला ठाऊक आहे. १९९९ पूर्वीच्या शिक्षकांना ते लागू होत नाही."** "नंतरच्या शिक्षकांबाबतीत 'एक्झम्प्शन' मिळाल्यानंतर नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरावी लागेल" हे आम्ही त्यांना सांगितले. त्यावर ते काहीच बोलत नव्हते. **त्यांची भूमिका ते उद्या बोरीवलीला पत्र पाठवून कळविणार आहेत. इतर मागण्यांबाबत तर अजून चर्चा सुरू सुद्धा झालेली नाही.**

काल दुपारी ३.०० वाजता महासंघाशी चर्चा होती. २ तासांपर्यंत शिक्षणमंत्री आलेच नाहीत. आल्याबरोबर त्यांनी आम्हाला सांगितले की, **"राज्यातील सर्व कुलगुरूंचा तुमच्या आंदोलनाला विरोध आहे. विद्यार्थ्यांचासुद्धा विरोध आहे, असे कुलगुरू म्हणतात."** विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंना व विद्यार्थ्यांना या वादात ओढण्याचा शिक्षणमंत्र्यांचा प्रयत्न निषेधार्ह तर आहेच, पण त्यांची करावी तेवढी निंदा थोडीच आहे. कुलगुरू अशा प्रकारची भूमिका घेतील यावर हा महासंघ विश्वास ठेऊ शकत नाही. अनेक कुलगुरूंनी नेटसेट बाबत लेखी स्वरूपात विद्यापीठ अनुदान आयोगाला व शासनाला आपली भूमिका कळविली आहे व ती महासंघाच्या भूमिकेला ठाम पाठिंबा देणारी आहे. "वेतन सुधाराच्या समग्र योजनेला" त्यांचा विरोध आहे, हे खरे वाटत नाही. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या या निषेधार्ह भूमिकेमुळे आंदोलन तीव्र करण्याचा पुढील निर्णय घेण्यात येत आहे.

(१) मंगळवार दिनांक ४ ऑगस्ट २००९ रोजी सर्व शिक्षक विद्यापीठाच्या मुख्यालयावर मोर्चा नेऊन मा. कुलगुरूंना निवेदन देऊन उपरोक्त दोन बाबतीत त्यांची भूमिका (जी काही असेल ती) शासनाला त्यांनी कळवावी, अशी त्यांना विनंती करतील.

(२) मा. कुलगुरूंना अकारण या वादात ओढण्याच्या उच्चशिक्षण मंत्र्यांच्या भूमिकेचा धिक्कार म्हणून विद्यापीठाच्या कामकाजातील आपला सहभाग दिनांक ४ ऑगस्ट या दिवसापासून बंद करतील.

(३) मुळात तशी संघटनेची इच्छा नसतांना उच्च शिक्षण मंत्र्यांनीच सुरूवात केल्यामुळे दिनांक ४ ऑगस्ट पासून विद्यार्थ्यांचे मेळावे घेऊन, त्यांना आंदोलनाची भूमिका विशद केली जाईल.

(C.R.Sadasivan) (E.H.Kathale)
President General Secretary

**M F U C T O**

"मा. सभापतींना प्रा. बी.टी.देशमुख यांच्याशी काही बोलावयाचे आहे, त्यांनी तातडीने प्रत्यक्ष भेटावे अशी त्यांची सूचना आहे." असे त्यांनी सांगितले. मंत्रालयापासून ५ मिनिटाच्या अंतरावर असलेल्या विधानभवनात प्रा.बी.टी.देशमुख यांनी मा. सभापतींची भेट घेतली, चर्चा केली व ते अर्धा पाऊण तासात परत आलेत.

२४. मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर चर्चेची शेवटची फेरी सायंकाळी ७.०० वाजता सुरु झाली. प्रतिनिधी मंडळ उच्च शिक्षण मंत्र्यांच्या दालनातच बसलेले होते. तेथे निरोप आला, "**प्रा.बी.टी.देशमुख, अध्यक्ष सी.आर.सदाशिवन व आणखी एक प्रतिनिधी अशा तिघांना मुख्य सचिवांच्या दालनात बोलाविले आहे**" त्याप्रमाणे "प्रा.बी.टी.देशमुख, प्रा. सी.आर.सदाशिवन व सौ. मधु परांजपे यांनी जावे" असे ठरले. त्यापुढील सर्व चर्चा मा. मुख्य सचिवांच्या दालनातच झाली. महासंघाच्या वतीने त्या चर्चेत हे तिघे सहभागी होते. एक तासात मसुदा तयार झाला. पुढे तो टाईप करायला एक तास लागला. मसुदा तयार झाल्यानंतर तो प्रतिनिधी मंडळाला दाखविण्यात आला. काही दुरुस्त्या सुचविण्यात आल्या, त्या उभयपक्षी मान्य झाल्या, त्याचवेळी चर्चगेट येथील कार्यालयांत उपस्थित असलेल्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांना मंत्रालयात बोलाविण्यात आले व मंत्रालयातील मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या दालनात कार्यकारी मंडळाची बैठक झाली व मसुदा मान्य करण्यात आला. मुख्य सचिवांच्या दालनात उभयपक्षी स्वाक्षऱ्या झाल्या. सायंकाळी सात वाजेपासून तर स्वाक्षऱ्या होईपर्यंत पूर्णवेळ मा. मुख्य सचिव उपस्थित होते. या चर्चेत पूर्ण वेळ उपस्थित असलेल्या मा. उच्च शिक्षण मंत्री यांनी आमच्या समवेत शेवटी घेतलेल्या पत्रकार परिषदेला उपस्थित राहूनच मा. मुख्यसचिवांनी त्यांचे दालन सोडले. मंत्रिमहोदयांची पत्रकार परिषद मुख्य सचिवांच्या दालनातच झाली.

२५. सायंकाळी ७ वाजता चर्चा सुरु झाल्यापासून तर स्वाक्षऱ्या होईपर्यंत व पत्रकार परिषद संपेपर्यंत संपूर्ण वेळ मा. मुख्य सचिव उपस्थित होते. रात्रौ २३.३० वाजता मंत्रालयातून कार्यकारी मंडळ संघटनेच्या चर्चगेट येथील कार्यालयात आले व तेथे समारोपाची बैठक सुरु झाली. महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या या तातडीच्या बैठकीत सन्माननिय तोडगा निघाल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले व प्रा.बी.टी.देशमुख यांनी दिलेला विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा त्यांनी मागे घ्यावा अशी विनंती करणारा ठराव एकमताने सम्मत करण्यात आला. त्या ठरावातील भावनांचा आदर करित प्रा.बी.टी.देशमुख यांनी महासंघाच्या ठरावाला अनुकुलता दर्शविली. महासंघाच्या उपरोक्त ठरावानुसार दिनांक २७ ऑगस्ट २००९ रोजी दुपारी ३.०० वाजता महासंघाचे अध्यक्ष प्रा. सी.आर.सदाशिवन, महासचिव डॉ.इ.एच.कठाळे, ज्येष्ठ नेते श्री.संभाजीराव जाधव, शिक्षक आमदार श्री. वसंतराव खोटरे यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. श्री. शिवाजीराव देशमुख यांची भेट घेतली. त्यावेळी विधानमंडळाचे प्रधान सचिव श्री. अनंत कळसे व सचिव श्री. शिंदेकर उपस्थित होते. महासंघाच्या अध्यक्षांनी ठरावाचे निवेदन मा. सभापतींना दिले, सोबतच मतैक्यपत्रक समाविष्ट असलेल्या इतिवृत्ताची प्रत सुद्धा जोडण्यात आली होती. मा. सभापतींच्या उपस्थितीत प्रा. बी.टी.देशमुख यांचा राजीनामा मागे घेण्याची विधिमय प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

२६. दिनांक २६ ऑगस्ट २००९ रोजी रात्री उशिरा मंत्रालयातील मा. मुख्यसचिवांच्या दालनात उभयपक्षी स्वाक्षरीत झालेल्या मतैक्यपत्राचा समावेश असलेले इतिवृत्त सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १२३ वर प्रसृत करण्यात आलेले आहे.

प्रा. डॉ. एकनाथ कठाळे, *महासचिव*

प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी, *सहसचिव*

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (MFUCTO)**

*****

*सहपत्र : चार*

## *महाराष्ट्र शासन*

### *क्र. एनजीसी २००८/(२४३/०८)/विशि-१*

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,: मंत्रालय,**

**विस्तार भवन मुंबई-४०० ०३२ : दिनांक : ४ ऑगस्ट, २००९**

प्रति,

**अध्यक्ष,**

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज ॲण्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन, आर.के. गोकुळधाम, अे/२०५, एस.व्ही.रोड, बोरीवली (प) मुंबई-४०० ०९२

**विषय** :- आपण पुकारलेला संप मागे घेण्याबाबत.

संदर्भ :- समक्रमांकाचे दि. २४ व ३१ जुलै, २००९ चे पत्र.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मा. मंत्री (उ.व तं.शि.) तसेच मा. मंत्री (वित्त) यांच्या समवेत वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार आपणांस संदर्भाधीन पत्रान्वये शासनाकडील वस्तुस्थिती कळविण्यात येऊन संप मागे घेण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र आपण केलेल्या विनंतीनुसार मा. मंत्री (वित्त) व मा. मंत्री (उ.व तं.शि.) यांच्या समवेत पुन्हा दि. ३ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत. :-

(i) शिक्षकीय पदांच्या सेवानिवृत्तीचे वय सध्या प्रमाणे (शासकीय महाविद्यालयांतील शिक्षक सोडून) ६० वर्षे राहील.

(ii) **रजांबाबत (Leave Package) सध्या अस्तित्वात असलेले नियम पुढील निर्णय होईपर्यंत लागू राहील.**

(iii) विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सन १९९१-९९ या कालावधीत बिगर **नेट/सेट अधिव्याख्याता / शिक्षकांच्या प्रकरणांचा केंद्रशासन / यु.जी.सी.कडे पाठपुरावा करण्यासाठी एक तदर्थ समिती गठीत करण्यात येईल.**

२. आता आपल्या मुख्य मागण्यांबरोबरच वरील मागण्यांबाबत शासनाने योग्य ते लक्ष घातलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आपला संप मागे घेण्याची आपणांस पुन्हा विनंती आहे.

आपला

**(रा.गो.जाधव)** शासनाचे उप सचिव

*नैमित्तीक रजेचे लाभ कलम ८ (४) अंतर्गत निर्देश*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

***शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००८/(०८-अ/०८) विशि-४ अर्थ :***

***मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ : दिनांक ११ मे, २००९***

**प्रस्तावना** : **विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा विषयक बाबी लागू आहेत.** तथापि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार सेवाविषयक काही बाबीचे पालन करण्यात येत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक नैमिर १४९८/प्र.क्र.५२/९८/सेवा-९, दिनांक २१ डिसेंबर, १९९८ अन्वये **शासकीय कर्मचाऱ्यांना एका कॅलेंडर वर्षामध्ये ८ नैमत्तीक रजा अनुज्ञेय आहेत.** महाराष्ट्रातील काही अकृषि विद्यापीठांमध्ये तसेच विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना एका कॅलेंडर वर्षामध्ये ८ पेक्षा जास्त नैमित्तीक रजा अनुज्ञेय करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब शासनाच्या या विषयीच्या आदेशाचे उल्लंघन करणारी आहे.

**शासन निर्णय** :- वरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८ (४) अंतर्गत राज्य शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक नैमिर १४९८/प्र.क्र.५२/९८/सेवा-९, दिनांक २१ डिसेंबर, १९९८ अन्वये **शासकीय कर्मचाऱ्यांना एका कॅलेंडर वर्षामध्ये ज्याप्रमाणे ८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय आहेत त्याप्रमाणेच विद्यापीठांचे व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना एका कॅलेंडर वर्षामध्ये एकूण ८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील.**

२. सदरहू निर्देशाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०२२४१६०६५४००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(भरत सुर्यवंशी)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

*सहपत्र : पाच*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरुवार, दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीत सम्मत झालेला ठराव.

**मुंबई, दि. ६ ऑगस्ट, २००९ :-** उच्च शिक्षण सचिवांनी पाठविलेले २४, ३१ जुलै व ४ ऑगस्ट २००९ चे अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे पत्र, **अशी तीनही पत्रे काळजीपूर्वक विचारात घेण्यात आलीत.** पहिल्या पत्रामध्ये करण्यात आलेली चूक दुरुस्त करण्यासाठी दुसरे पत्र तयार करण्यात आले. दुसऱ्या पत्रात आणखी जास्तीचा घातक मजकूर भरण्यात आला. त्यावर खुलासा करण्यासाठी तिसरे पत्र लिहिण्यात **आले त्यात पुन्हा आणखी जास्त घातक मजकूर भरण्यात आला आहे.**

२.१ केंद्र शासनाची वेतन सुधाराची "समग्र योजना" या शब्दाऐवजी "केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी" हीच शब्दरचना पुन्हा पुन्हा वापरण्यात येत आहे व त्या पाठोपाठ "**अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे" ही न करण्यात आलेली मागणी मान्य करुन उच्च शिक्षणमंत्र्यांनी अत्यंत घातक असा पायंडा पाडला आहे.** असे करतांना त्यांनी विधानमंडळ सभागृहात दिलेली आश्वासने पूर्णपणे पायदळी तुडविलेली आहेत. एकाच पक्षाचे सरकार केंद्रामध्ये व त्याच पक्षाचे सरकार राज्यामध्ये असतांना व समग्र योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकार ८० टक्के अर्थ सहाय्य देण्यास तयार असतांना त्याच पक्षाच्या महाराष्ट्र शासनातील उच्च शिक्षण मंत्र्यांनी घेतलेली भूमिका निश्चितच धक्कादायक आहे. **"घरभाडे भत्ता व वाहतूक भत्ता राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे असेल" असे म्हणणे ही वेगळी गोष्ट आहे.** मात्र गेल्या ३०-४० वर्षात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने प्रयत्न केले व त्यातून विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र सरकार, राज्य सरकार व विद्यापीठे यांनी केलेल्या सहकार्यातून मा. चॅन्सेलरांच्या (मा. राज्यपाल) सम्मतीने महाराष्ट्रामध्ये अनेक वर्षाच्या मेहनतीने "**परिनियमांनी स्थापीत झालेली सेवाशर्तींची व्यवस्था**" मोडून काढून शिक्षकांचे भवितव्य नासवू पाहणाऱ्या व त्यांचा आत्मसन्मान कस्पटासमान समजणाऱ्या सेवाशर्तींची पायाभरणी करणाऱ्या नव्या व्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवण्याची सुरुवात म्हणून सहाव्या वेतन आयोगाच्या संधीचा वापर करण्याच्या प्रयत्नांचा तीव्र धिक्कार करण्यात येत आहे.

२.२ "Element of promotions involved therein" हे एक वाक्य सुद्धा टाकायला ते तयार नाहीत. एका रात्रीतून "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे." हे वाक्य जावून त्या जागी** "राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना **केंद्र शासनाप्रमाणे (यु.जी.सी. योजना) वेतनश्रेणी** व महागाई भत्ता दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याचा व इतर भत्ते व अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे." हे वाक्य जसे आले, तसे उद्या ते एका रात्रीतून प्रमोशन व्यवस्था कदाचित लागू करतील, आंदोलन मोडून काढण्यासाठी दुसऱ्या रात्री जी.आर. सुद्धा काढतील, पण **त्यांच्या या डावपेचामुळे सेवाशर्तींचे बलीदान करण्याची बाब महाराष्ट्रातील प्राध्यापक कधीही मान्य करणार नाहीत.**

३. नेट-सेट बाबतसुद्धा केलेली मूळ मागणी संपूर्णपणे बाजूला ठेवून शिक्षकांनी न केलेल्या मागण्या मान्य करून आपल्या **विपरित बुद्धीचा त्यांनी परिचय दिलेला आहे.** १७ डिसेंबर २००८ रोजी त्यांनी विधान मंडळात मान्य केले की, त्या काळात "कायद्याने नेट-सेट लागू केलेली नव्हती" पुढे त्यांनी "२४ डिसेंबरच्या आत याबाबतचा जी.आर. काढण्यात येईल" "तसेच **हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल." "तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."** असेही सांगितले. या सर्व शब्दांचा त्यांना आता विसर पडला असून ते आता **अनावश्यक तदर्थ समिती गठित करीत आहेत.** हा साराच प्रकार चमत्कारिकपणाचाच म्हटला पाहिजे.

४. **उच्च शिक्षण मंत्री हे सरळ सरळ असत्य बोलत आहेत.** "मा. कुलगुरूंच्या बैठकीत नेट-सेट बाबत व समग्र योजने बाबत विरोधी निर्णय घेण्यात आला आहे." असे जे त्यांनी सांगितले ते संपूर्ण असत्य आहे. **मा. कुलगुरूंच्या बैठकीत असा कोणताही ठराव झाला नाही.** असे अनेक कुलगुरूंनी सांगितले. काहींनी तर त्यांच्या विद्यापीठांनी नेट-सेट बाबत घेतलेल्या अनुकुल भूमिकेची कागदपत्रे आमच्या सुपूर्द केली आहेत. उच्च शिक्षण मंत्र्यांनी अत्यंत उथळपणे हा प्रश्न हाताळला आहे. अशा स्थितीत आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात येत असून **मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट २००९ या दिवशी महाराष्ट्रभर "जेलभरो आंदोलन" राबविण्यात येईल.** सर्व विद्यापीठाच्या मुख्यालयी पण पुणे येथे उच्च शिक्षण संचालकांच्या कार्यालयापुढे हे आंदोलन राबविले जाईल. आंदोलनात सहभागी असलेले सर्व शिक्षक विद्यापीठ कार्यालयावर मोर्चा नेतील व आपणास अटक करवून घेतील.

५. उच्च शिक्षण मंत्री त्याच त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा सांगत आहेत. एकतर चुकीचा प्रस्ताव सचिवांनी तयार केल्यामुळे व आता तो मंत्रिमंडळात मान्य झाल्यामुळे ते अडचणीत सापडले आहेत किंवा सेवाशर्ती उध्वस्त करण्याचा मोठा कार्यक्रम त्यांनी जाणूनबूजून हाती घेतला आहे. दोनपैकी कोणतीही गोष्ट खरी असली तरी **"यापुढे चर्चा नाही" असे त्यांनीच स्वतः सांगितल्यामुळे त्यांच्याशी यापुढे चर्चा न करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. राज्याचे मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी याबाबतीत तत्परतेने लक्ष घालावे अशी त्यांना विनंती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

प्रा. सी.आर.सदाशिवन
अध्यक्ष

प्रा.ई.एच.कठाळे
सचिव

**एमफुक्टो**

***"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे." या वाक्याचा अर्थ पत्र लिहिणारांना कळला की नाही हे त्यांचे त्यांना ठाऊक पण महासंघाला तो नक्की कळला. राज्यात शासकिय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या वेतनश्रेण्या व ३१ डिसेंबर २००८ च्या केंद्र शासनाच्या (यु.जी.सी.) वेतनश्रेण्यामध्ये जुन्या समतुल्य वेतनश्रेण्यांसाठी सारखेच पे बँड प्रस्तावित असले तरी ग्रेड पे मध्ये फार मोठे फरक असून त्यात यु.जी.सी.च्या वेतनश्रेण्या सरस आहेत. शिवाय श्रेणीवाढीची बहूमुखी संधी हे यु.जी.सी. वेतनश्रेण्यांचे एक खूपच आकर्षक वैशिष्ट्य आहे.***

*(अहवालाचा परिच्छेद ९ पहा)*

*सहपत्र : सहा*

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ,
**अमरावती.** - ४४४ ६०४

क्रमांक : 2009 / एलसी/ १
फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का.(०७२१) २६६३६४६
**दिनांक : ११.०८.२००९**

**मा. सभापती,**
महाराष्ट्र विधानपरिषद,
मुंबई.

**मार्फत** :- मा. जिल्हाधिकारी, अमरावती.

मा. महोदय,

**१.** "केंद्र शासनाची विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठीची वेतन सुधारणेची समग्र योजना" व "कायद्याने ज्या काळात नेटसेटची पात्रता लागूच केलेली नव्हती त्याकाळातील सेवा धरण्यासंदर्भात करावयाची उपाययोजना" या दोन विषयावर शासनाच्या वतीने विधानपरिषदेमध्ये देण्यात आलेली आश्वासने पुढील प्रमाणे आहेत. :-

**समग्र योजनेबाबत**

१.१ "एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील." (वि.प.का. २९ डिसेंबर २००८ पृष्ठ जेजे-२)

१.२ "युजीसीकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल." (वि.प.का. २९ डिसेंबर २००८ पृष्ठ केके-१)

१.३ "एक महिन्याच्या आत कुठल्याही पद्धतीन सहावा वेतन आयोग युनीर्व्हसीटी टिचर्सना लागू होईल." असे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी विधानपरिषदेत दिनांक ४ जून २००९ रोजी सांगितले. (वि.प.का. ४ जून २००९ पृष्ठ पी-२)

**नेटसेट बाबत**

१.४ **तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सांगितले तीन महिन्यात चूक दुरुस्त करणारा शासननिर्णय काढतो. :** "तदर्थ स्वरुपाच्या नेमणूका देणे, वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे इ. अटी यु.जी.सी. ने व केंद्र शासनाने घातलेल्या नाहीत .... **तेव्हा या वरील अटी रद्द करणार आहात काय ते सांगा.**" या प्रश्नाला तत्कालीन मा.उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी **एका शब्दात ठामपणे "होय" असे उत्तर दिले.** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१)* पण वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी सेवा धरणारा शासन निर्णय अजूनही निघाला नाही.

१.५ "**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, **ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लीगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील." *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१)*

१.६ **महाराष्ट्रात नेटसेट ही पात्रता परीक्षा केंव्हा सक्तीची झाली ते सुद्धा मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात सांगितले :** विधीवतरित्या नेटसेटची पात्रता १९९९ पर्यंत महाराष्ट्रात लागूच करण्यात आली नव्हती, एवढेच सांगून मा. उच्च शिक्षण मंत्री थांबले नाहीत तर ती केंव्हा पासून लागू करण्यात आली, हे सुद्धा त्यांनी त्याच दिवशी सभागृहात सांगितले. ते पुढील शब्दात :- "ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू करण्याची वेळ आली त्यावेळी दिनांक ११-१२-१९९९ रोजी मी शिक्षण मंत्री होतो त्यावेळी या संदर्भात विहित पध्दतीने विद्यापीठांना आदेश देण्यात आले होते. एवढेच नव्हे तर विद्यापीठ कायद्यात सुध्दा त्या संदर्भात आपण काही दुरुस्ती केली होती. त्याचा परिणाम असा झाला की १९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत." *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१)*

१.७ **ही चुक झालेली आहे ही गोष्ट विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुन्हा मान्य केली. :** "सभापती महोदय,... अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा **स्टॅट्युटमध्ये** किंवा व्हाईस चॅन्सेलरच्या **डायरेक्शनसमध्ये** किंवा गव्हर्नमेन्टच्या **कोड मध्ये** यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही" असे मा. विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी सभागृहात पुन्हा सांगितले. (वि.प.का. १७ डिसेंबर २००८ पृष्ठ जीजी-२)

१.८ १७ डिसेंबर २००८ रोजी त्यांनी विधान परिषदेत मान्य केले की, त्या काळात "कायद्याने नेट-सेट लागू केलेली नव्हती" (वि.प.का. १७ डिसेंबर २००८ पृष्ठ जीजी-२)

१.९ "२४ डिसेंबरच्या आत याबाबतचा जी.आर. काढण्यात येईल" (वि.प.का. १७ डिसेंबर २००८ पृष्ठ जीजी-२)

१.१० "तसेच **हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल.**" (वि.प.का. १७ डिसेंबर २००८ पृष्ठ जीजी-३)

१.११ **"तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."** असेही सांगितले. (वि.प.का. १७ डिसेंबर २००८ पृष्ठ एचएच-१)

१.१२ "पण शासनाने निर्णय न कळविल्यामुळे वरीष्ठ व निवड श्रेणीतील स्थाननिश्चिती देता आली नाही म्हणून शासन याबाबतचा निर्णय केंव्हा काढणार आहे" असा उपप्रश्न विचारला असता मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "परत एकदा या संदर्भात अत्यंत कडक सूचना देण्यात येतील" असे उत्तर दिले. (वि.प.का. १२ जून २००९ पृष्ठ झेडझेड-५ )

१.१३ या सूचनेची प्रत सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय? या प्रश्नाला उच्च शिक्षणमंत्र्यांनी 'होय' असे उत्तर दिले. (वि.प.का. १२ जून २००९ पृष्ठ एएए-५ )

२. "केंद्र शासनाची विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठीची वेतन सुधारणेची समग्र योजना" व "कायद्याने ज्या काळात नेटसेटची पात्रता लागूच केलेली नव्हती त्याकाळातील सेवा धरण्यासंदर्भात करावयाची उपाययोजना" हे दोन मुख्य विषय यामध्ये आहेत. या दोन विषयावर शासनाच्या वतीने सभागृहात देण्यात आलेली आश्वासने वर १.१ ते १.१३ वर उद्धृत केलेली आहेत. देण्यात आलेल्या उपरोक्त १३ पैकी एकाही आश्वासनाच्या पूर्तीसाठी आतापावेतो उच्च शिक्षण मंत्र्यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. उलट विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांविषयी

***(१) "अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे."***
***(२) "रजांबाबत (Leave Package) सध्या अस्तित्वात असलेले नियम पुढील निर्णय होईपर्यंत लागू राहील." हे पत्रान्वये कळविले ते खरे की शासननिर्णय खरा ?***
***त्यामुळेच इतिवृत्तात खुलासा करावा लागला.***

नोकरशाहीच्या मनामध्ये असलेल्या आकसापोटी सुडाने पेटल्यासारखे या दोनही बाबतीत त्यांनी सचिवांच्या संपूर्ण दबावाखाली विपरित करणी मात्र जोरात सुरु केलेली आहे.

३. केंद्र शासनाच्या वेतन सुधारणेच्या समग्र योजनेबाबत आश्वासने काय होती व विपरित करणी काय झाली हे पाहू. यामध्ये मुळात सभागृहामध्ये देण्यात आलेली आश्वासने वर परिच्छेद १.१ ते १.३ वर नमूद केलेली आहेत. या आश्वासनांची पूर्तता तर त्यांनी केलीच नाही पण विपरीत करणी मात्र बहूत केली. प्राध्यापक महासंघाने केंद्राची समग्र योजना कार्यान्वित करण्यासाठी आग्रह धरण्याची दोन प्रमुख कारणे, (मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात,) नमूद केलेली आहेत. एक म्हणजे केंद्र शासनाचे ८० टक्के म्हणजे २ ते ३ हजार कोटी रुपयाचे अर्थसहाय्य "समग्र योजनेला"च मिळते, अटींची मोडतोड केली तर मिळत नाही. दुसरे असे की, पहिल्या वेळी २३ एप्रिल १९७७ रोजी मा. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असतांना, दुसऱ्यावेळी १८ जानेवारी १९८९ रोजी मा. शरदराव पवार मुख्यमंत्री असतांना, तिसऱ्या वेळी ७ डिसेंबर १९९९ रोजी मा. श्री दिलीप वळसे पाटील उच्च शिक्षण मंत्री असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी झालेल्या मतैक्य पत्रामध्ये महाराष्ट्रात समग्र योजनाच लागू करण्याचे निर्णय त्या त्या वेळी झाले होते. दुसऱ्या वेळी एका बाबीचा अपवाद व तिसऱ्या वेळी ३ बाबी अपवाद म्हणून मान्य करण्यावर मतैक्य झाले होते. आजही एखाद्या दुसऱ्या बाबीचा अपवाद विचारात घेण्याची महासंघाने तयारी दाखविली होती.

३..१ केंद्र शासनाचे २ ते ३ हजार कोटी रुपयाचे अर्थसहाय्य आपण गमावणे हे योग्य नाही, हे वारंवार सांगून सुद्धा दिनांक २४ जुलै २००९ रोजी महासंघाला सचिवांच्या सहिने पत्र पाठवून "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" असे लेखी कळविण्यात आले. यामुळे प्राध्यापकांमध्ये तिव्र असंतोष निर्माण झाला. कारण ही आश्वासनाची अम्मलबजावणी नव्हती तर विपरित करणी होती. कारण राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन आयोग लागू करावा ही केंद्राची योजना नाही किंवा प्राध्यापक महासंघाची तशी मागणी नव्हती. सचिवांनी एकतर्फी पत्र पाठविल्यामुळे चर्चा बंद पडली व पत्रव्यवहार सुरु झाला. प्राध्यापक महासंघाने या वाक्यरचनेतील पोरकटपणा ठराव करुन व पत्र पाठवून लक्षात आणून दिला.

३.२ त्यावर सचिवांनी एक आठवड्याने ३१ जुलै २००९ रोजी पुन्हा एक पत्र पाठवून "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" हे वाक्य गाळून टाकले व त्याऐवजी "राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना केंद्र शासनाप्रमाणे (यु.जी.सी. योजना) वेतनश्रेणी .... **लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.**" असे एका पत्रान्वये कळविले. शासनाची भूमिका कळवितांना पहिल्या वाक्यापेक्षा आता दुरुस्त करण्यात आलेले दुसरे वाक्य हे पूर्णपणे वेगळे होते. सचिव या पदाची विश्वासार्हताच त्यामुळे संपुष्टात येते. हजारो शिक्षक वर्गाबाहेर असतांना २४ जुलैच्या पत्रातील बेजबाबदार वाक्य कसे वापरण्यात आले? हे जाणून घेण्याचा शिक्षकांना अधिकार आहे. विपरित

***सहपत्र : सात***

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

**PRESS RELEASE : FOR FAVOR OF PUBLICATION**

### CHIEF MINISTER INTERVENES IN TEACHERS' INDEFINITE CEASE WORK NEGOTIATION TO CONTINUE

A delegation consisting of 16 members of the Executive comittee of the MFUCTO had a meeting with Shri Ashok Chavan, Hon'ble Chief Minister of Maharashtra, today, 16th August 2009 at 12.45 p.m. at Varsha, Mumbai. In the meeting the Chief Minister stated that he has understood that the two issues viz., Implementation of the composite UGC scheme on VI Pay Commission and the wrongful implementation of NET/SET retrospectively on teachers appointed prior to December 1999.

2. As far as the NET/SET issue was concerned the Chief Minister stated that he was in agreement with the MFUCTO that it should be resolved through a policy decision of the Government rather than sending individual cases of thousands of teachers to the UGC. The CM however stated that the Hon'ble Minister for Higher & Technical Education, Shri Rajesh Tope was not able to participate in today's discussion and therefore only the one-sided view was available to him. It would be necessary therefore that the view of the Minister for Higher & Technical Education and his Department was also obtained before taking a final decision in the matter.

3. As far as the other issue of the UGC composite scheme for implementation of the Sixth Pay Commission was concerned, the Government would receive 80% assistance only if the composite scheme was implemented in full. There were certain benefits which if implemented for teachers, it was government's apprehension that other sections would also make similar demands which would involve huge financial commitment that government today was not in a position to accept. The Chief Minsiter also admitted that with some modifications the composite scheme could be accepted.

4. In view of this position, further negotiations will be necessary when the Hon'ble Minister for Higher & Technical Education would also be present along with his officials. The Hon'ble Chief Minister agreed to fix another meeting on Wednesday, 19th or Thursday, 20th or Friday, 21st August 2009 according to the convenience of the Minister for Higher & Technical Education so that final decision could be arrived at.

5. The Executive Committee of the MFUCTO met thereafter to discuss the further course of action. MFUCTO at the outset expressed its deep appreciation for the Hon'ble Chief Minister to have intervened at the request of the MFUCTO and for agreeing to continue the negotiations to resolve the issues.

6. MFUCTO expressed a hope that the intervention of the Hon'ble Chief Minister and further negotiation will lead to a fruitful understanding between the government and the MFUCTO to pave the way for ending the indefinite cease work and restarting of all academic work with full compensation to the students of the academic loss

| | | |
|---|---|---|
| Mumbai | (C.R. Sadasivan) | (E.H. Kathale) |
| 16th AUGUST 2009 | President | General Secretary |

करणीच्या हट्टाला पेटलेल्या मंत्र्यांनी व सचिवांनी या दुसऱ्या पत्रात "केंद्र शासनाची समग्र योजना" या शब्दाऐवजी "केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी" ही शब्दरचना वापरली व त्या पाठोपाठ "**अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे" ही न करण्यात आलेली मागणी मान्य करुन उच्च शिक्षणमंत्र्यांनी अत्यंत घातक असा पायंडा पाडला.** असे करतांना त्यांनी विधानमंडळ सभागृहात दिलेली आश्वासने पूर्णपणे पायदळी तुडविलेली आहेत. "गेल्या ३०-४० वर्षात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने प्रयत्न केले व त्यातून विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र सरकार, राज्य सरकार व विद्यापीठे यांनी केलेल्या सहकार्यातून मा. चँन्सेलरांच्या (मा. राज्यपाल) सम्मतीने महाराष्ट्रामध्ये अनेक वर्षाच्या मेहनतीने "**परिनियमांनी स्थापीत झालेली सेवाशर्तीची व्यवस्था**" मोडून काढून शिक्षकांचे भवितव्य नासवू पाहणाऱ्या व त्यांचा आत्मसन्मान कस्पटासमान समजणाऱ्या सेवाशर्तींची पायाभरणी करणाऱ्या नव्या व्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवण्याची सुरुवात म्हणून सहाव्या वेतन आयोगाच्या संधीचा वापर करण्याच्या प्रयत्नांचा तीव्र धिक्कार करण्यात येत आहे." असा ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने केला व तो उच्च शिक्षणमंत्र्यांना पत्राने कळविला.

४. नेट-सेट बाबतसुद्धा देण्यात आलेली मुळ आश्वासने संपूर्णपणे बाजूला ठेवून शिक्षकांनी न केलेल्या मागण्या मान्य करून आपल्या **विपरित बुद्धीचा त्यांनी परिचय दिलेला आहे.** नेटसेट बाबत सभागृहात देण्यात आलेली आश्वासने वर परिच्छेद १.४ ते १.१३ मध्ये दिलेली आहेत.

४.१ एकदा "**४ एप्रिल २००० च्या युजीसीच्या अधिसूचनेतील खंड २ चे दुसरे परंतुक लक्षात घेता त्या तारखेपूर्वी नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी.**" असा मसुदा उभयपक्षी मान्य झाला. त्यानंतर सचिव म्हणाले "**आम्हाला एक दिवस पाहिजे आम्हाला कायदेतज्ञांशी चर्चा करावयाची आहे.**" त्याप्रमाणे मध्ये एक दिवस गेला. परत आल्यावर सचिव पूर्णपणे बदलले होते, त्यांनी मंत्र्यांनासुद्धा घेरले होते, सचिवांचे म्हणणे असे की "**आम्ही ही सर्व प्रकरणे युजीसीकडे पुन्हा पाठवू, कोणत्या तारखेपासून सूट द्यायची हे त्यांना विचारू, नंतर काय ते ठरवू.**"

४.२ महासंघाने त्यांना असे सांगितले की, "४ एप्रिल २००० नंतरच्या शिक्षकांना सुट देण्याचे अधिकार युजीसीला आहेत पण तारीख वेगळी नमूद करण्याची तरतुद त्या अधिसूचनेत कोठेही नाही." त्यावर तसा हायकोर्टाचा निर्णय आहे. असे सचिवदलाने सांगितले. कोणता निर्णय आहे? असे विचारल्यावर २७ नोव्हेंबर २००० चा मा. नागपूर खंडपिठाचा निर्णय दाखविण्यात आला. तो पाहिला असता त्याच्यात "the UGC shall notify the date or dates from which exemption from qualifying in NET/SLET in respect of Universities/Institutions Deemed to be Universities as well'' हे वाक्य होते. त्यातील सुरुवातीच्या दोन ओळीच फक्त ते वाचत होते. हे 'जज्जमेंट' आहे की 'ऑब्झर्वेशन' असे महासंघाने विचारल्यावर सचिवदलाने ऑब्झर्व्हेशन असे उत्तर दिले. त्यावर महासंघाने त्यांच्या असे लक्षात आणून दिले की, "तो ऑपरेटीव्ह पार्ट ऑफ दि जज्जमेंट नाही व ऑब्झर्वेशनसुद्धा नाही. मा. उच्च न्यायालयाने केंद्र शासनाच्या १२ नोव्हेंबर २००८ च्या आदेशातील परिच्छेद अवतरणात दिले आहेत. या आदेशानंतर युजीसीने नोटीफिकेशन काढायचे आहे, गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर ते लागू होईल. ते वाक्य व्यक्तीला लागू नाही, विद्यापीठाला लागू आहे. शिवाय तो आदेश अमलात आल्यावर १२ नोव्हेंबर २००८ नंतरच्या प्रकरणी लागू होईल." हे ऐकल्यावर सचिव दलाची तोंडे खर्रकन खाली

***सहपत्र : आठ***

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

**MFUCTO'S IMMEDIATE RESPONSE TO THE GOVERNMENT RESOLUTION ON THE SIXTH PAY**

1. MFUCTO has been able to get a copy of the G.R. No. NGC 2009/(243/09)-UNI-1 dated, 12th August 2009 (hereinafter referred to as the "said GR") through the Government Website only on 17th August 2009 after 8.00 p.m., when it was for the first time put on the Website by the Government. MFUCTO is shocked that the Higher and Technical Education Department has gone ahead with the issuance of the said G.R. even when the negotiations between the MFUCTO and the Hon'ble Chief Minister have been going on. The G.R. could have waited for a few days more till the final meeting of the MFUCTO with the Hon'ble Chief Minister, so that any understanding reached at such meeting could have been incorporated in GR to make it complete.

2. Further shocking are paras-13 and 14 of the said G.R. It is clear from para 14 that this G.R. is not the final position of the Government. Normally the G.R. is an instrument to make the Government decision known to the public. However para. 14 in the said G.R. states that **"This G.R. is subject to the decision taken by the State Government on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31/12/2008".** Unfortunately, the decisions taken by the State Government on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31/12/2008 are not within the knowledge of public and **if the said G.R. is based on the decisions taken by the State Government on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31/12/2008 then what is the need for including para-14 ?**

3. Para. 13 states that "Government orders in respect of the measures required for enhancing and improving the quality of education shall be issued separately". Any step taken towards enhancing and improving the quality of education is a welcome step. However teachers are entitled to know whether these orders are part of the Govt. of India package or are prepared/would be prepared locally by the bureaucracy at the State level.

4. **If the said GR is genuinely issued on 12th August 2009 and if the contents of the said GR are genuinely issued as per the Government's firm and final decisions and are to remain valid, then how the department came to issue advertisements in several newspapers after the 12th August 2009 containing statements contrary to the contents of the GR?**

MFUCTO has carefully examined every paragraph of the Government Resolution and will in due course of time issue detailed response parawise after getting the above issues resolved.

| | | |
|---|---|---|
| MUMBAI | C.R.SADASIVAN | E.H.KATHALE |
| 18th AUG 2009 | President | General Secretary |

MFUCTO

उतरली.

४.३ त्यानंतर त्यांनी हट्ट धरला की आमचा ऑक्टोबर २००१ चा एक शासननिर्णय आहे. त्यावर महासंघाने त्यांना असे सांगितले की २००१ चा शासननिर्णय १९९९ पूर्वी कसा लागू होईल? शिवाय नेटसेट पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्यावर सचिवदल काही बोलले नाही. नेटसेटबाबत २४ जुलैच्या पत्रात नेटसेट विषयी त्यांनी काय लिहिले, हे ३१ जुलैचे पत्र लिहितांना त्यांच्या लक्षात राहत नाही व ३१ जुलैला त्यांनी काय लिहिले हे ४ ऑगस्ट रोजी पत्र लिहितांना त्यांच्या लक्षात राहत नाही.

५. समस्या व मागण्या अनेक असतात, अनेक लहान असतात, अनेक त्यापेक्षा मोठ्याही असतात, त्या अनेक समुहांच्या असतात, संघटीतांच्या असतात, असंघटीतांच्या असतात, प्रत्येक समूह आपापल्या परीने त्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करीत असतो, त्यासाठी आंदोलने होतात, काही मागण्या पूर्ण होतात, काही होत नाहीत. ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्राध्यापकांचे आंदोलन व त्यांच्या मागण्या हा काही माझ्या या पत्राचा विषय नाही. सभागृहामध्ये काम करणाऱ्या सदस्याचे निश्चित कार्यक्षेत्र असते. महाराष्ट्राच्या मागास भागातील अनुशेष निर्मूलन व शिक्षक आणि शिक्षण ही दोन आमच्या जिव्हाळ्याची कार्यक्षेत्रे आहेत. गेल्या १०-१५ वर्षात अनुशेष प्रश्नाने आमच्या एकूणच कामाचा फार मोठा भाग व्यापून टाकलेला आहे. फार लहानसा भाग शिक्षक व शिक्षणाच्या वाट्याला येतो. असे असले तरी शिक्षक आणि शिक्षण हा आमच्या जिवीचा जिव्हाळा आहे. ज्या व्यवस्थेमध्ये शिक्षकांना अपमानित करण्यात येते तेथे शिक्षणाची दुर्गती सुरु होते, शिक्षण व्यवस्थेच्या दुर्गतीला एकदा सुरुवात झाली की एकूण समाजव्यवस्थेच्या दुर्गतीची सुरुवात ही दूर नसते.

६. मा. उच्च शिक्षणमंत्री राजेश टोपे यांचे या सर्व प्रकरणातील वर्तन संपूर्णपणे अशोभनिय होते. एप्रिल महिन्यात आंदोलनाची त्यांना नोटीस देण्यात आल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष आंदोलन सुरु होईपर्यंत आंदोलनकर्त्यांशी एकदाही चर्चा केली नाही. १४ जुलैला आंदोलन सुरु झाल्यानंतर आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाला मला तुमचे कोणतेच निवेदन मिळाले नाही असे ते म्हणाले, उघडच आहे की हे विधान संपूर्णपणे असत्य होते. नंतरसुद्धा एकूण पोरखेळ केल्यासारखे त्यांचे वागणे होते. आंदोलनकर्त्या महासंघाच्या कार्यकारी मंडळाला त्यांनी चर्चेसाठी बोलावून २ तास बसवून ठेवले व ते २ तास कुलगुरुंशी गप्पा मारत बसले होते. परत आल्यावर चर्चा सुरु करतांना त्यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला "मा. कुलगुरूंच्या बैठकीत नेट-सेट बाबत व समग्र योजने बाबत विरोधी निर्णय घेण्यात आला आहे." असे सांगितले. ते संपूर्ण असत्य होते. **मा. कुलगुरूंच्या बैठकीत असा कोणताही ठराव झाला नाही.** असे अनेक कुलगुरूंनी सांगितले. काहींनी तर त्यांच्या विद्यापीठांनी नेट-सेट बाबत घेतलेल्या अनुकुल भूमिकेची कागदपत्रे उपलब्ध करून दिलीत. उच्च शिक्षण मंत्र्यांनी अत्यंत उथळपणे हा प्रश्न हाताळला आहे. त्यानंतर नविन कॉलेजसाठी परवानगी मागणाऱ्या अर्जदारांच्या गर्दीशी ते बोलत होते व इकडे महासंघाशी चर्चाहि करीत होते.

७. सभागृहात मोजून मापून आश्वासने देणारे व त्याची नेटकेपणी अंमलबजावणी करणारे मंत्री मी पाहिलेत. अनेक मंत्री शक्यतोवर आश्वासने देतच नाहीत, दिली तर त्याप्रमाणे कारवाई करतात. अनेक आश्वासनांच्या बाबतीत सभागृहात खूप पाठपुरावा करावा लागतो व विलंबाने का होईना पण त्याची अंमलबजावणी होते. असे अनेक प्रकार मी भरपूर पाहिलेले आहेत. पण स्पष्ट शब्दात मुदतबंद आश्वासने दिली असतांना एखादा मंत्री २-३ हजार कोटीचे अर्थसहाय्य गमावण्याची तयारी ठेवून सुद्धा एकाहि आश्वासनाची अम्मलबजावणी तर करीत नाहीच पण विपरित करणी करतो. यातून एक नविनच प्रश्न निर्माण होतो. "२ ते ३ हजार कोटीचे ८० टक्के केंद्राचे अर्थसहाय्य गमावले तरी चालेल पण समग्र योजनेतील अटींची मोडतोड करणारच" हा सचिवांचा हट्ट पुरविण्यासाठी सचिवांनी मंत्र्याला काम करायला लावायचे की सभागृहात आपण विचारपूर्वक दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यासाठी मंत्र्यांनी सचिवाला कामी लावायचे हा यातील खरा नवा प्रश्न आहे. "सचिव विश्वासार्हता गमावतात तेंव्हा ते काहीच गमावत नसतात, मंत्र्यांनी किंवा शासनाने विश्वासार्हता गमावणे हे सर्वस्व गमावण्यासारखे असते." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने प्रकाशित केलेल्या प्रकाशनाच्या मथळ्यातून व्यक्त केलेल्या विचाराशी मी सहमत आहे.

८. सभागृहामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांचे स्वरुप काय असते व आश्वासनपूर्तीबाबत विभागाची वृत्ती कशी असावी या संदर्भात आठव्या लोकसभेच्या आश्वासन समितीने आपल्या दुसऱ्या अहवालाच्या परिच्छेद १२ मध्ये नमूद केले आहे की, ....

"As pointed out by the Committee on earlier occasions the Committee wish to re-emphasise that the assurances given by the Ministers are undertakings given solemnly on the floor of the House and the concerned Ministry/Department must put in sincere endeavours to implement them before the prescribed time limit"

शासनाच्या वतीने गांभीर्यपूर्वक सभागृहात दिलेले अभिवचन असे मा. मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचे स्वरुप असते आणि त्या त्या विभागाने नमूद केलेल्या मुदतीच्या आत ते अभिवचन पूर्ण करण्याचा तळमळीचा प्रयत्न केला पाहिजे. असा प्रयत्न परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या आश्वासनांच्या संदर्भात झालेला नाही विपरित करणी मात्र जोरात सुरु होती हे मी खेदपूर्वक नमूद करीत आहे.

९. सभागृहामध्ये दिलेल्या या आश्वासनांचा महासंघाशी झालेल्या या चर्चेमध्ये वारंवार उल्लेख होत राहिला. उच्च शिक्षण सचालकांनी त्याच्याशी चर्चा होत असतांना सभागृहातील आश्वासनाविषयी जे अभद्र उद्‌गार काढले ते महासंघाने लेखी मंत्रीमहोदयांच्या लक्षात आणून दिले. एकूणच चर्चेमध्ये सचिव व सचिवदल आश्वासनांच्या पूर्ततेसाठी कार्य न करता त्याच्या विपरित करणीची योजना आखत होते व त्याला उच्च शिक्षणमंत्र्यांची पूर्णपणे साथ होती.

१०. सभागृहात काम करणे हे निरर्थक आहे अशी भावना विधानमंडळ सदस्यांच्या मनामध्ये निर्माण होणे हा त्याच्या 'सदस्य'त्वाचा अंतच असतो. वर नमूद केलेल्या आश्वासनांच्या बाबतीत उच्च शिक्षण मंत्र्यांनी केलेली व ते करीत असलेली लाजिरवाणी विपरित कृती लक्षात घेता हे काम करणे निरर्थक आहे अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण झालेली आहे हे मान्य करतांना मला अजिबात लाज वाटत नाही. जे काम करणे निरर्थक आहे अशी भावना आपल्या मनामध्ये निर्माण होते ते काम करीत राहणेही निरर्थकच असते. या भावनेतूनच मी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. स्वतंत्र राजीनामा पत्र सोबत जोडले आहे. आपल्या सहकार्याबद्दल व स्नेहाबद्दल आभारी आहे.

आपला स्नेहांकीत
**(बी.टी.देशमुख)**
विधानपरिषद सदस्य

**सहपत्र** परिच्छेद १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे सोबत जोडले आहे.

*****

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ,
**अमरावती.** - ४४४ ६०४

क्रमांक : IV / एलसी/ ८१
फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का.(०७२१) २६६३६४६
**दिनांक : ११.०८.२००९**

**मा. सभापती,**
महाराष्ट्र विधानपरिषद,
मुंबई.

मा. महोदय !

मी माझ्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. कृपया स्विकृत व्हावा ही विनंती. आपल्या सहकार्याबद्दल व स्नेहाबद्दल आभारी आहे.

आपला स्नेहांकीत
**(बी.टी.देशमुख)**
विधानपरिषद सदस्य

*****

*Revision of Pension of pre 1.1.2006 Pensioners*

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## Finance Department : Resolution No. PEN 1009/CR29/SER-4 Mantralaya, Mumbai 400 032 dated 5th May 2009.

**Read :** 1) Government Resolution, Finance Department, No. PEN 1008/CR 99/SER-4, Dated 27th October, 2008.

2) Government Resolution, Finance Department, No. Vepur 1209/CR 20/SER-9 Dated 27th February, 2009.

**RESOLUTION**

In view of the recommendations of sixth pay commission of Central Government, State Government has set up the State Pay Revision Committee, 2008 under the Chairmanship of Shri.. P.M.A. Hakim to revise the pension of State Government pensioners. As per the recommendation of the Committee Govt. vide GR dated 27th Feb. 2009 referred to above at sr.no. 2 has decided to revise the pension of the pensioners. Accordingly the pension of the pensioners who retired before 1st January, 2006 is revised as follows :-

2. In these orders :-

(a) **"Existing pensioner"** means a pensioner who was drawing/entitled to pension on 31st December 2005.

(b) **"Existing pension"** means the basic pension inclusive of commuted portion, if any, due on 31st December 2005. It covers all classes of pension (except wound/injury pension) under the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 or any other pension rule under which the Government servant was governed at the time of retirement.

(c) **"Existing Dearness Relief"** means the relief due to the pensioners as on 1st January, 2006 for following period :-

| Sr. No. | Period | Monthly rates of D.A. |
|---|---|---|
| 1 | From 1st January 2006 | 0 |
| 2 | From 1st July 2006 | 2 % |
| 3 | From 1st January 2007 | 6 % |
| 4 | From 1st July 2007 | 9 % |
| 5 | From 1st January 2008 | 12 % |
| 6 | From 1st July 2008 | 16 % |

3. On the lines of the recommendations of Central Sixth pay commission, the State Govt. has decided to revise the pension of the pensioners who retired before 1st January, 2006 by giving 40% increase on the basic pension (basic pension which does not include D.A. & D.P.) vide G.R. dated 27th Feb. 2009. Accordingly pension in respect of the pensioners who retired before 1.1.2006 will be fixed as per the example given below :-

| | |
|---|---|
| A Basic pension as on 1st January 2006 | Rs.10,000 |
| B D.P. | Rs. 5,000/- |
| C D.A. 24 % | Rs. 3,600/- |
| D 40% increase on basic pension (A above) | Rs. 4,000/- |
| E Pension as on 1.1.2006 (A+B+C+D) | Rs. 22,600/- |

4. Ready reckoner indicating admissible revised pension due on 1st January, 2006 with 40% increase as above on basic pension is enclosed as **Annexure 1.** Thus the entire amount will form the **consolidated pension** with effect from 1st January, 2006.

5. All Pension disbursing Authorities (i.e.pay & Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be) are hereby authorised to pay pension to existing pensioners at the consolidated rates without any further authorisation from the Accountant General, (A&E)-1, Maharashtra, Mumbai or Accountant General, (A&E)-II Maharashtra, Nagpur, as the case may be.

6. In cases where the pensioner was alive as on 1st January 2006 and subsequently his legal heir is/are also entitled for the life time arrears with effect form 1st January, 2006 till the death of pensioner. For this purpose legal heir of pensioner may also apply to pension disbursing Authorities i.e. pay & Accounts Officer, Mumbai/Treasury Officers/Heads of Departments/Offices, as the case may be.

7. The employed/re employed pensioners are not getting Dearness Relief on pension at present, under the extant orders. In their case, the notional Dearness Relief which would have been admissible to them but for their employment/re-employment will be taken into account for consolidation of their pension in terms of these orders, as if they were drawing the Dearness Relief. Their pay will be refixed with effect from 1st January, 2006 with reference to consolidated pension becoming admissible to them. Dearness Relief after 1st January 2006 will, however, not be admissible to them during the period of employment.

8. Government is also pleased to direct that the above **decision should, mutatis mutandis apply to those pensioners of Recognized and Aided Educational institution, Non-Agricultural Universities and affiliated Non-Government Colleges and Agricultural Universities etc.,** to whom the pension scheme is made applicable.

9. Pension should be revised form 1st January, 2006. But the pensioners will get revised pension from 1st April, 2009. The arrears due to revision with effect from 1st January, 2006 to 31st March, 2009 (both days inclusive) should be paid in cash in 5 equal installments over the next 5 years after adjusting the amount of advance sanctioned vide Government Resolution No. PEN 1008/CR 99/SER-4 dated 27/10/2008 in the first installment.

10. In exercise of the powers conferred by the proviso to section 248 of the Maharashtra Zilla parishadas and panchayat Samiti's Act 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decisions apply to the pensioners of Zilla parishadas.

11. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the Pensions of the Pensioners mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder. However, if necessary, concerned Administrative Departments of Mantralaya should take necessary steps to present supplementary Demands in the ensuing session of the Legislature to cover expenditure to be incurred in respect of aforesaid pensioners.

12. This Government Resolution is available on the web site of Government of Maharashtra i.e. "www.maharashtra.gov.in" and its computer code number is 20090505133552001

By Order and in the name of Governor of Maharashtra.

**Nilesh B. Wadekar**

Deputy Secretary to Government

# ANNEXURE - 1

Table showing existing Basic pension Without Dearness Pension (Column-1) Basic Pension with Dearness Pension (Column -2) and revised Consolidated Pension (Column-3)

**(NOT PRINTED)**

## मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातील काही महत्वाचा भाग

(१) मा. उच्च न्यायालयाने २० फेब्रुवारी २००२ रोजी ५०२२ ऑफ २००१ या प्रकरणात दिलेल्या निर्णयामध्ये परिच्छेद २ चा सुरुवातीचा भाग पुढील प्रमाणे आहे. :-

"By the above Resolution, the State Government has laid down that the Lecturers, who were appointed between the period from 19th September, 1991 to 11th December, 1999, and without possessing the qualifications of NET/SET, would be protected and they are required to obtain the said qualifications by December, 2003 or before and in case they failed to acquire these requisite qualifications, within the said period, they would be entitled for the pay scale of Rs. 8000-13500 till their superannuation. In addition, they shall not be entitled for promotion, senior grade or selection grade. Those who passed the NET/SET examination, within the stipulated extended period, would be entitled for senior/selection grade from that date and their seniority will be also counted accordingly."

(२) याच प्रकरणात परिच्छेद २५ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

"**We certainly find fault with this clause.** When the Government has adopted the Regulations as framed by the Commission and if the Commission does not provide for such a clause in its Regulations, the State Government cannot deviate from the said Regulation. If the appointees upto 11th December, 1999 failed to obtain the NET/SET qualifications by December, 2003. Undoubtedly they continued to be unqualified to hold the post of Lecturer and they can not be continued beyond December, 2003. **The concession granted by the State Government in this clause is contrary to the Regulations framed by the Commission.**"

(३) याच निर्णयात परिच्छेद १७ मध्ये मा. न्यायालयासमोर कोणती प्रकरणे आहेत याचा तपशिल पुढील शब्दात नमूद आहे. :-

"The petitioners, who are before us, could be categorised in the following groups.

(a) Appointed from 12th Dec, 1999 to 3rd April 2000.

(b) Appointees from 4th April, 2000 to 12th June, 2000.

(c) Appointees from 13th June, 2000 to 18th October, 2001."

(४) मा. उच्च न्यायालयाने २७ नोव्हेंबर २००८ रोजी ४२६६ ऑफ २००८ या प्रकरणात दिलेल्या निर्णयात पुढील प्रमाणे आदेश आहेत. :-

"**So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission s decision in its meeting dated 7th and 8th October 2008.** If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, **undoubtedly, their proposals will have to be considered and approved, ...**"

## दिनांक २३ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय

सन १९९१ ते सन १९९९ या काळातील नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवत्ताच्या परिच्छेद ५ मध्ये पुढील निर्णय घेण्यात आला होता. :- "त्यानंतर पुढील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. :- "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने दिनांक ३ व ४ सप्टेंबर २००८ च्या सभेमध्ये (उपरोक्त परिच्छेद ३(viii) मध्ये नमूद) केलेल्या शिफारसी व त्यानंतर अशा ६३७ शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने या शिफारशींवर (परिच्छेद ३(ix) मध्ये नमूद) घेतलेला निर्णय लक्षात घेता, १९९१ ते १९९९ या काळात नेमणूका झालेल्या नेट-सेट ग्रस्त शिक्षकांची प्रकरणे, यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविली नसल्यास, ती संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ या दोनही विद्यापीठाकडून Relaxation/Exemption करिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याची प्रक्रिया तत्परतेने पूर्ण करण्यात यावी, असा ठराव करण्यात येत आहे."

### *महाराष्ट्र शासन*

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**

**क्र.संकीर्ण-२००९/(३५९/०९)/विशि-१:दिनांक २०ऑगस्ट,२००९**

प्रति,

कुलगुरू, सर्व विद्यापीठे

विषय :- संपावर असलेल्या अध्यापकांविरूद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेबाबत

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाचे क्र. संकीर्ण -२००९/(३५९/०९)/विशि-१, दि. ७ ऑगस्ट, २००९ चे पत्र कृपया पहावे.

२. शासनाने सर्व रास्त व न्यायोचित मागण्या मान्य केल्या असूनही महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज अँण्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन या संघटनेने दि. १४.७.२००९ पासून त्यांचा चालू असलेला संप मागे घेतलेला नाही. या संदर्भात आपल्या स्तरावरुन संपावर असलेल्या शिक्षकांवर काय कार्यवाही करण्यात आली आहे याचा कोणताही अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही.

३. विद्यापीठ क्षेत्रांतर्गात कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयांवर शैक्षणिक व इतर दृष्टीने नियंत्रण ठेवण्याची सर्व जबाबदारी व अधिकार विद्यापीठाचे आहेत. या विषयी मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे आदेश व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ प्रमाणे आपल्याला सर्व प्रकारची कारवाई करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून आपल्याला प्रदान करण्यात आलेले अधिकार वापरून आपण संपावर असलेल्या शिक्षक व त्यांच्याशी संबंधीत कॉलेज व्यवस्थापनावर योग्य ती कारवाई करावी जेणे करुन विद्यार्थ्यांचे होणारे अहित टाळता येऊ शकेल. आपण केलेली कारवाई कुठल्याही परिस्थितीमध्ये दि. २६ ऑगस्ट, २००९ पर्यंत शासनास कळवावी. जर विद्यापीठाने योग्य ती कारवाई केली नाही तर शासनाला विद्यापीठाविरूद्ध कार्यवाही करणे भाग पडेल.

आपला

सही/- **(रा.गो.जाधव)**

प्रत - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी. (१) संचालक (उच्च शिक्षण) (२) सर्व सहसंचालक (उ.शि.) यांनी त्यांचे स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी व दि. २६.८.२००९ पर्यंत शासनास अहवाल पाठवावा.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. MAHBIL/ 2001/4448** Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **08.09.2009**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

-----------------------------------------------

To,..............................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................